सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ क्र.: साफुपुवि/निववि/७०५ दिनांक : १३/०७/२०२४

प्रति,
प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आराखडा व अंमलबजावणी संदर्भात जागृती शास्त्रशुद्ध माहितीसाठी शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकरिता तालुकानिहाय एक दिवसीय कार्यशाळेच्या सादर केलेल्या प्रस्तावांच्या मंजुरीबाबत...

**संदर्भ** : साफुपुवि/निववि/६८९, दिनांक २९/०६/२०२४

महोदय/ महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात जागृती शास्त्रशुद्ध माहितीसाठी शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकरिता तालुकानिहाय एक दिवसीय कार्यशाळेच्या आयोजनासाठी Online पध्दतीने विहीत मुदतीत सादर केलेल्या प्रस्तावांपैकी गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शकतत्वास अनुसरुन छाननी अंती पात्र ठरलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील महाविद्यालये/ परिसंस्थांना मार्गदर्शकतत्वामध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकरिता एक दिवसीय कार्यशाळेच्या आयोजनासाठी कमाल रुपये ५०,०००/— (रुपये पन्नास हजार फक्त) इतके अर्थसाहय्य मंजूर करण्यात येत आहे.

आपणास विनंती की, सदर कार्यशाळेचे आयोजन गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केलेल्या विहीत नियम व अटींच्या आधिन राहून करण्यात यावे. फक्त विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात यावी. संस्थेचे कोणतेही स्वागत कार्यक्रम होणार नाही याची काळजी घ्यावी.

महाविद्यालये/ परिसंस्था यांनी संपर्क अभियानाचे आयोजनानंतर सर्व कागदपत्रांसहीत प्रस्ताव दिनांक २५ जूलै,२०२४ पूर्वी नियोजन व विकास विभागात सादर करावीत.

कळावे,

आपला विश्वासू

वनसिंग एच. वळवी
उपकुलसचिव

सोबत : १) मंजूरी मिळालेल्या महाविद्यालये/ परिसंस्थांची यादी
२) QR Code (गूगल फॉर्म)

## संलग्नित महाविद्यालये/ परिसंस्था तालुकानिहाय शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आराखडा व अंमलबजावणी संदर्भात कार्यशाळा

शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जागृती व शास्त्रशुध्द माहिती मिळण्यासाठी तालुकानिहाय एकदिवसीय कार्यशाळेच्या आयोजनाकरीता प्रति महाविद्यालय रु. ५०,०००/— इतके अर्थसहाय्य गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत देण्यात येईल.

खालील नमूद विषयांवर शिक्षक व संबंधित प्रशासकीय कर्मचाऱ्यांकरिता कार्यशाळा घेण्यात याव्यात. कार्यशाळेची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात यावी. शक्यतो कोणताही सत्कार समारंभ ठेवण्यात येऊ नये. किमान दोन वेळा हजेरी व प्रत्येक सत्राचा फोटो घेण्यात यावा. कार्यशाळेच्या बॅनरवरती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील नियोजन व विकास विभागाकडून गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे असे नमूद करावे. खालीलपैकी तीन विषय निवडण्यात यावे.

1) Curriculam framework for UG programs under NEP 2020
2) Major / Minor Subject Selection
3) Open Electives : Basket and Sharing
4) I K S ( Indian Knowledge Systmes - Subject Specifics and Generic)
5) Skill development – OJT, RP, & Internship and curriculam activites
6) Assessment Evaluation, and Examination
7) Academic bank of credit and multiple entry & multiple exit.
8) Outcome based education Importance and Implements
9) CO, PO mapping and curriculum design
10) Teaching Learning process

### Suggested Plan of Workshop

| Maximum time allotted | Particulars |
|---|---|
| 30 min | Inaugural Session<br>(Starting with University Song) |
| 90 min | Topic 1 |
| 90 min | Topic 2 |
| **WORKING LUNCH BREAK** | |
| 90 min | Topic 3 |
| 60 min | Question , Answer session and Validictory |

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
PLANNING AND DEVELOPMENT
PUNE-7

**गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विद्यापीठाशी संलग्नित सर्व तालुकानिहाय महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना ' नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आराखडा व अंमलबजावणी संदर्भात जागृती व शास्त्रशुध्द माहितीसाठी' शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचेकरीता एक दिवसीय कार्यशाळा घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याबाबतची मार्गदर्शक तत्वे व कार्यनिर्देश मार्गदर्शिका (शैक्षणिक वर्ष २०२४–२५)**

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ च्या अर्थसंकल्पातील गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत पुणे, पुणे ग्रामीण, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्हयामधील विद्यापीठाशी संलग्नित सर्व तालुकानिहाय महाविद्यालये/परिसंस्थांमध्ये 'नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आराखडा व अंमलबजावणीबाबतच्या जागृकतेसाठी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी खालील नमूद विषयांवर एकदिवसीय कार्यशाळेच्या आयोजनाकरीता प्रति महाविद्यालये/परिसंस्थाना अर्थसहाय्य देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

कार्यशाळेसाठी खालील पैकी तीन विषय निवडण्यात यावे.

1) Curriculam framework for UG programs under NEP 2020
2) Major / Minor Subject Selection
3) Open Electives : Basket and Sharing
4) I K S ( Indian Knowledge Systmes - Subject Specifics and Generic)
5) Skill development – OJT, RP, & Internship and curriculum activites
6) Assessment Evaluation, and Examination
7) Academic bank of credit and multiple entry & multiple exit.
8) Outcome based education Importance and Implements
9) CO, PO mapping and curriculam design
10) Teaching Learning process

कार्यशाळा :

**विषय : पुणे, पुणे ग्रामीण, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्नित सर्व तालुकानिहाय महाविद्यालये/ परिसंस्थामधील शिक्षक व प्रशासकीय कर्मचारीसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणीबाबतच्या' जागृतीसाठी कार्यशाळाचे आयोजन**

नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुर्नमूल्यांकन केलेली अथवा मूल्याकंन/पुर्नमूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए. मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याची चलनाची साक्षांकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल.

**कार्यशाळा अर्थसहाय्य तपशील** – कार्यशाळेसाठी उपस्थित शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची संख्या खाली नमूद केल्याप्रमाणे आवश्यक आहे. उपस्थित शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा तपशील गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सादर करणे अनिवार्य आहे. मूळ उपस्थिती पत्रकावर सहभागी शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्याचे नाव पूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

..२

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

| अ. क्र. | कार्यशाळा | कालावधी | उपस्थिती संख्या | जास्तीत जास्त मंजूर अर्थसहाय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी NEP implementation कार्यशाळा | १ दिवस | शिक्षक/ प्रशासकीय कर्मचारी यांची संख्या १०० | कमाल रु. ५०,०००/— |

१. एकाच संस्थेच्या विविध महाविद्यालये/परिसस्थांनी व तालुकानिहाय महाविद्यालये/ परिसंस्थांनी एकाच ठिकाणी, एकाच दिवशी कार्यशाळेचे आयोजन करू नये.

२. तसेच कार्यशाळांचे आयोजन एकच दिवस असल्याने अनुदान मंजूर करताना एक दिवसाचा खर्च अर्थसहाय्यास पात्र राहील. तसेच सदर कार्यशाळा विद्यापीठाने तयार केलेल्या कार्यनिर्देश मार्गदर्शिकेप्रमाणे (एस.ओ.पी.) आयोजित करावी. विद्यापीठाने मंजुरी दिलेल्या महिन्यातच कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात. अन्यथा अर्थसहाय्य देण्यात येणार नाही. तसेच आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळांच्या खर्चामध्ये उद्घाटन, समारोप, सत्कार, शाली, स्मृतीचिन्ह, फुलांचे गुच्छ इ. खर्चाचा समावेश विद्यापीठाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून करण्यात येऊ नये.

३. संबंधित महाविद्यालय/परिसंस्था/अस्थापनेच्या लेटर हेडवर शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यास कार्यशाळेस उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त केल्याचा पुरावा, कार्यशाळेचे हिशेब सादर करताना सहभागी शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांची नावे यादीबरोबर जोडणे बंधनकारक आहे.

४. कार्यशाळा आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा.
अ. साधनव्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च — ३०%
ब. शैक्षणिक साहीत्य व किरकोळ खर्च — ३०%
क. अतिथ्य खर्च, — ४०%
उपरोक्त नमूद केलेल्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्याचा विनियोग त्या—त्या अर्थशीर्षासाठी करण्यात यावा. अन्य अर्थशीर्षासाठी खर्च करण्यात येवू नये. (उदा. अ—३०%, ब—३०%, क—४०%, यामध्ये त्या—त्या टक्केवारीपेक्षा जास्त खर्च देय होणार नाही किंवा त्या टक्केवारीमधील शिल्लक रक्कम इतरत्र वापरता येणार नाही.)

..३

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

५. सदर कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तींना देण्यात येणारे मानधन खालीलप्रमाणे देय राहील.

तालुकानिहाय कार्यशाळेसाठी उपस्थित राहणाऱ्या साधन व्यक्तीस **प्रति दीड तासाचे प्रत्येकी एक व्याख्यान** रु. ५,०००/— इतके मानधन देण्यात यावे. (जास्तीत जास्त दोन व्याख्याते) (एकाच साधन व्यक्तीला दोन व्याख्यानांपेक्षा जास्त मानधन देण्यात येऊ नये.)

६. महाविद्यालये/परिसंस्थांनी कार्यशाळा यांचे आयोजन त्याच शैक्षणिक वर्षाच्या **३० जून २०२४ पर्यंतच** करुन व त्यांचे हिशेब विद्यापीठाकडे सादर करावेत.

७. प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यशाळेच्या वेळापत्रकात किंवा साधनव्यक्तींच्या नावात (Resource Person) जर बदल करावयाचा असल्यास त्यास कार्यशाळेच्या आयोजनाच्या तारखेपुर्वी विद्यापीठाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच **कार्यशाळेस उपस्थित साधन व्यक्तींना सहभागी व्यक्ती म्हणून दाखविता येणार नाही.**

८. कार्यशाळा आयोजित केल्यानंतर त्याची देयके विद्यापीठास सादर करताना त्यासोबत व्यासपीठ व त्यावरील बॅनर तसेच सभागृहात उपस्थित सहभागी व्यक्ती यांचे प्रत्येक सत्राचे स्पष्ट (Geo tagged) छायाचित्र (फोटोग्राफ) जोडणे आवश्यक आहे.

९. कार्यशाळेस उपस्थित सहभागी व्यक्तींच्या उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी स्वतंत्र उपस्थित पत्रकावर घेणे अनिवार्य आहे. जर सहभागी व्यक्तींची उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी नसेल तर कोणत्याही खर्चाची देयके स्विकारली जाणार नाहीत.

१०. महाविद्यालय/परिसंस्थेने कार्यशाळेचे आयोजन केल्यानंतर त्याचे कार्यवृत्तांत अहवाल (प्रोसीडींग) छापणे अनिवार्य आहे.

११. महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे/संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१२. कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेच्या प्राचार्य/संचालक यांच्या मान्यतेची प्रत जोडणे अनिवार्य आहे. सदर महाविद्यालये/परिसंस्थेमध्ये मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक नसतील तर अर्थसहाय्य मंजुर करण्यात येणार नाही.

..४

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

१३. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज केला असेल अथवा ज्या महाविद्यालयात नवीन विद्यार्थी संख्या शून्य आहे. अशा महाविद्यालय/परिसंस्थेस कार्यशाळा आयोजन करण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी कार्यशाळेचे आयोजन केल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

१४. **कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने जर प्रस्तावांमध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती भरल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र समजण्यात येईल.**

१५. दरवर्षी विद्यापीठ वार्षिक अहवालासाठीची माहिती देणे बंधनकारक आहे. नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना–हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभागए विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा तसेच चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नीकरणाचे (नूतनीकरण) शुल्क भरलेल्या चलनाची छायाप्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१७. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील कायमस्वरुपी मान्यताप्राप्त/प्रभारी प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१८. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरु नसावी.

१९. सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे.

२०. महाविद्यालय/परिसंस्थांनी कार्यशाळेचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन प्रस्ताव मंजूर केलेल्या तारखेनंतर गुणवत्ता सुधार योजनेचा मार्गदर्शकतत्वानुसार करावे.

..५

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

२१. महाविद्यालय/परिसंस्थांनी खर्चाचे हिशोब सादर करताना विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावाचे साक्षांकित प्रत जोडावी.

२२. महाविद्यालय/परिसंस्थांनी आयोजित केलेल्या कार्यशाळेचे आयोजन मंजूर खर्चाचे हिशोब सनदी लेखापालाकडून तपासून प्रमाणित करून सादर करावेत. सनदी लेखापाल यांचे लेखापरिक्षण शुल्क विद्यापीठांकडून अदा केले जाणार नाही.

२३. सदर कार्यशाळेसाठी उपस्थित रहाणाऱ्या साधन व्यक्तींचा व्याख्यानाचा दिवस, वेळ व विषय यांचे वेळापत्रक सादर करण्यात यावे.

२४. मानधन व प्रवास भत्त्याचा स्वतंत्र क्लेम फॉर्म जोडण्यात यावा. मानधन व प्रवास भत्त्याचा स्वतंत्र क्लेम फॉर्मवर संबंधित साधन व्यक्तीचे आगाऊ स्टॅम्प रिसीटवर व रक्कम क्लेम केल्याच्या ठिकाणी स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

.........

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

## Google Form

**Session Code :-----------------------------------------------------------------------------------------------------**

**Name of Teacher/ Non-Teaching Staff : ------------------------------------------------------------------**

**Name of the College/ Institute :---------------------------------------------------------------------------**

**------------------------------------------------------------------------------------------------------------------------------**

**City. :----------------------- ---------------E-mail ID :----------------------------------------------------**

**Mobile : ------------------------------------------------------------------------------------------------------------**

**Signture : -----------------------------------------------------------------------------------------------------------**

13/7/24

Teaching & non Teaching NEP workshop

| Opening Date | Workshop_ID | PUNCODE | CollegeName | Application_ID | District | Taluka | Principal Name Eng | Principal_Reside_Phone | Coordinator Name | Coordinator Mobile No | Coordinator EmailID | Time |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20-07-2024 | TADSNEPW2449 | CAAA016410 | Shri Tilok Jain Dnyan Prasarak Mandal Shri Anand College Addr: Pathrdi Tal: Pathardi Dist: Ahmednagar Pincode: 414102 | SCW241641012 | AHMEDNAGAR | Pathardi | SHESHRAO BABURAO PAWAR | 9423465305 | Dr Bhavsar Dhiraj Vasant | 9566839683 | bhavsardv@gmail.com | 10:00 AM |
| ~~30-07-2024~~ 20-07-2024 रोजी उद्घाटन होईल | TADSNEPW2448 | CAAA019730 | Sanjivani Rural Education Society Sanjivani Arts Commerce and Science College Addr: Sanjivani Rural Education SocietyAt-Sahajnanad Nagar Tal: Kopargaon Dist: Ahmednagar Pincode: 423603 | SCW241973001 | AHMEDNAGAR | Kopargaon | Samadhan Bhagwan Dahikar | 9421804716 | Ms Bhutada Sarita Ashok | 9421804715 | sabhutada13@gmail.com | 10.00AM |

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT ★ PUNE-7 ★